विशेष दिवाणी दावा क्रं. 05/2019
नाभिराज/कार्यकारी अभियंता

## आदेश निशाणी क्रं. 12

सदरचे प्रकरण नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेले आहे. दावा दाखल करताना वादीने 36,00,000/—रूपये नुकसान भरपाई मागितली होती परंतु दरम्यानच्या काळात मुल्यांकण अधिकारी यांनी नुकसान झालेल्या झाडाची किंमत 45,64,776/—रूपये केली असल्याने वादीने अशी विनंती केली की, दाव्यात त्यांना वाढीव नुकसान भरपाई मिळावी म्हणून 45,64,776/—ही रक्कम नमुद करण्याची परवानगी दयावी.

2. प्रतिवादीने त्याच अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल करून असे सांगितले की, वरील दुरूस्ती मंजूर केल्यास दाव्याचे स्वरूप बदलणार आहे. दुरूस्ती ही कायदीयदृष्टया चुकीची आहे. सबब तो अर्ज खारीज करण्यात यावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

3. वादी, प्रतिवादीचे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. तसेच अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले.

4. दावा दाखल झाल्यानंतर वादीला असे कळाले की, नुकसान भरपाईची रक्कम 36,00,000/— रूपये नसुन 45,64776/—आहे त्याचे असे म्हणण्याचे कारण मुल्यांकण अधिकारी यांनी केलेल्या मुल्यांकणावरून ते असे सांगतात. रक्कम रूपये 36,00,000/—ऐवजी 45,64,776/— अशी दुरूस्ती केल्याने दाव्याचे स्वरूप बदलणार नाही, तशी दुरूस्ती बरोबर की चुकीची हे ठरविण्याची ही वेळ नाही, दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळेस दुरूस्ती बरोबर की चुक हे ठरविता येईल. परंतु दुरूस्ती बरोबर नाही हे दुरूस्तीला परवानगी न देण्याचे कारण असू शकत नाही. वादीला दाव्याच्या मुल्यांकणात दुरूस्ती करू दिल्यास दाव्याचा योग्य तो निकाल होण्यास मदत होणार आहे व प्रतिवादीला त्याची बाजू मांडण्याची संधी मिळणार आहे. सबब खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

1. वादीने दाव्यात दुरूस्ती करण्यासाठी केलेला अर्ज मंजूर करण्यात येतो.

2. वादीने पुढील तारखेपर्यंत दाव्यात दुरूस्ती करावी व दुरूस्त दाव्याची प्रत दाखल करावी. तसेच दाव्याचे योग्य मुल्यांकण करून कायदेशीर योग्य ती कोर्टफिस त्यावर दयावी.

3. खर्चाबद्दल आदेश नाही.

स्वाक्षरीत/—

दिनांकः—09.01.2023

(आर.टी.इंगळे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
परंडा

**cERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shivshankar Nagnath Bharati |
| Name of Court | : | Shri. R.T.Ingale<br>Civil Court S.D.,Paranda,<br>Osmanabad. |
| Order Date | : | 9.1.2023 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 9.1.2023 |
| Order uploaded on | : | 9.1.2023 |